<u>रे. दिवाणी मुकदमा क्र. २१९/२०१७ मधील निशाणी क्र. ३७ वरील आदेश</u>

(अधिक पवार वि अशोक पवार)

(CNR No. MHSN130008962017)

१. वादींनी सदरचा अर्ज हा गट क्र. ७४६ मधील येणारे ऊसाचे बिल कोर्टात जमा होवून मिळोसाठी दाखल केलेला आहे.

२. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे त्यांनी सदरचा दावा हा सरसनिरस मानाने वाटप होवून मिळणेकामी दाखल केलेला आहे. दावा मिळकती वादी व प्रवादी क्र. १ व २ यांच्या एकत्र कुटुंबाच्या मिळकती असून ते सामाईकात मशागत करुन उस, भुईमूग, सोयाबीन अशी पिके घेतात. प्रवादी क्र १ हा सोई गैरसोईनुसार सर्वांसाठी दावा मिळकत वहीत करतो. त्यामुळे वादी आवश्यक असणारे पैसे त्याला देवून कामे करुन घेत असतो. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे प्रवादी याने त्यांच्या सहमतीविना गट क्र. ७४६ मधील ऊसाचे पिक स्वतःचे नांवे सोनहिरा सहकारी साखर कारखाना येथे गळीतासाठी पाठवले व त्याचे बिल स्वतःच्या नांवे निघणेसाठी खटपट चालवली. तेव्हा वादींनी ३०/१/२०१७ ला अर्ज करुन ते बिल अदा करणेत येवू नये म्हणून विनंती केली. त्यावेळी संबंधीत कारखान्याने न्यायालयातून आदेश प्राप्त करणेविषयी कळवलेने त्यांनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

३. प्रवादी यांनी संबंधीत अर्जाला नि.४२ वर आपले म्हणणे दाखल केलेले आहे. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे दावा मिळकतीचे यापूर्वी सोईप्रमाणे वादी व प्रवादी यांच्या दरम्यान वाटप झालेले आहे. त्याप्रमाणे जमिनीचे वेगवेगळे हिस्से करणेत आलेले

असून संबंधीत पिक प्रवादी यांच्या क्षेत्रातून कारखान्यास पाठविणेत आलेले होते. प्रवादी यांच्या म्हणण्याप्रमाणे १७/११/२०१८ रोजी प्रवादी क्र १ यांच्या गट क्र ७४६ च्या हिश्यातून एमआयडीसी साठी जाणा–या विदयुत पुरवठयाच्या लाईनमधील लाईन पडलेने आग लागलेली होती. त्यांनी त्यामुळे तो ऊस कारखान्याला पाठवला. त्याचे बिल अडविणेसाठी म्हणून वादींनी सदरचा अर्ज सादर केलेला आहे.

४. वादी यांचे विद्वान वकील श्री यु. एस. यादव व प्रवादी यांचे विद्वान वकील श्री एस. आर. यादव यांचा युक्तीवाद ऐकलेवर पुढीलप्रमाणे गुण या अर्जाचे कामी काढणेत येतात.

| **अ.क्र.** | **गुण** | **उत्तर** |
|---|---|---|
| १ | वादी यांना गट क्र. ७४६ चे बिल कोर्टामध्ये जमा करुन घेणेसारखी प्रथमदर्शनी केस आहे काय ? | नाही |
| २ | काय हुकूम ? | अंतीम हुकूमाप्रमाणे |

## <u>कारणमिमांसा</u>

### <u>गुण क्रमांक १</u>

५. वादी यांचे विद्वान वकील श्री यु. एस. यादव यांनी युक्तीवाद सादर केला की सबंधीत क्षेत्रामध्ये जे ऊसाचे उत्पन्न घेतले गेले त्यासाठी आवश्यक असणारा खर्च वादींनी केलला आहे. तसेच त्यामधील पिक उगवून आलेनंतर वादीच्या गैरउपस्थितीमध्ये प्रवादींनी ते स्वतःच्या नांवे कारखान्याला पाठवलेले आहे. प्रवादी यांचे

विद्वान वकील श्री एस. आर. यादव यांच्या म्हणण्याप्रमाणे सोईप्रमाणे जे वाटप झाले त्याप्रमाणे प्रवादी क्र. १ याचे हिश्यातील क्षेत्रामध्ये ऊसाची पेरणी करुन त्याप्रमाणे कारखान्याला नोंद धरणेत आलेली होती. त्यानंतर संबंधीत पिक तयार झालेवर प्रवादी क्र १ यांच्या नांवे कारखान्याला पाठविणेत आले. त्यामुळे वादी यांना त्या बिलावर हक्क सांगता येवू शकत नाही.

६. वादी व प्रवादी यांच्या विद्वान वकील यांचा युक्तीवाद ऐकलेवर व दोन्ही बाजूंनी सादर केलेले कागदपत्र पडताळून पाहिलेवर वादी प्रवादी यांच्या दरम्यानचा वाटपाविषयीचा वाद प्रलंबित असलेचे दिसून येते. ऊस बिलाविषयी जरी वादी व प्रवादी यांचेमध्ये मतभेद असला तरी ऊस बिलाची गणना पैशाच्या स्वरुपात होवू शकते. त्यामुळे त्याविषयी योग्य तो निर्णय पुरावा प्राप्त झालेवर नंतर करता येवू शकतो. वादी यांच्या म्हणण्याप्रमाणे जरी त्या बिलामध्ये त्यांच्या हक्काचे पैसे असले तरी त्याप्रमाणे प्रवादी यांना ते देणेस आदेश करता येवू शकतात. प्रवादी यांनी सादर केलेल्या म्हणण्याप्रमाणे ऊसाची नोंद ही त्यांच्या नांवे असलेने कारखान्याला ऊस त्यांचे नांवे पाठविणेत आला हे विधान समर्पक असलेचे दिसून येते. त्यामुळे गुण क्रमांक १ चे उत्तर नाही म्हणून देणेत येते.

७. वादी यांनी सदरचा अर्ज हा कारखान्याला बिल थांबविणेविषयी आदेश करणेविषयी सादर केलेला आहे. तात्काळ या दावेचे कामी दावा मिळकतीविषयी कोणतीही गंभीर समस्या त्यामुळे उत्पन्न होवू शकत नाही. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश

पारीत करणेत येतात.

**आदेश**

१. वादीचा अर्ज अंशतः रदद करणेत येतो.

२. प्रवादी यांनी कोर्टामध्ये बिलाच्या रकमेचे हमीपत्र लिहून दयावे की निकालाअंती रक्कम वादीची असलेचे सिध्द झालेस ती तो कोर्टात जमा करेल.

सही/–

कडेगांव (वि.रा. घराळ)

दिनांक – २२/०१/२०१९ दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, कडेगांव